आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२० जून २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- ११व्या आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त आयोजित योगसंगमात नोंदणी करणाऱ्यांची संख्या १० लाखांच्या वर

- आषाढी वारी आणि योगदिनानिमित्त विविध कार्यक्रम

- भारताच्या मातीत हजारो वर्षांपासून सहकाराची भावना आहे, असं केंद्रीय कृषिमंत्र्यांचं प्रतिपादन

- कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरु

- भारत आणि इंग्लंड यांच्यात तेंडुलकर-अँडरसन चषक क्रिकेट कसोटी मालिका आजपासून सुरु होणार

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं निधन

**<><><><>**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या २१ जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिकांमधे भाग घेणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर योग दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं योग दिनाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम उद्या सकाळी बिबी का मकबरा परिसरात होणार आहे.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे....

**होल्ड बाईट**

दरम्यान, उद्याच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- विदेशातून नोंदणी करणाऱ्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात विविध संस्था संघटनाही सामूहिक योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या योग दिनी पुण्यात मुक्कामी आहेत. यानिमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तीयोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे साधारण दहा लाख साधक योगसाधना करणार आहेत.

सांगलीमध्येही उद्या सकाळी भक्तियोग, हा अनोखा उपक्रम साजरा होणार आहे. यामध्ये संपूर्ण सांगली जिल्ह्यात एकाच वेळेस एकाच तालावरती म्हणजे वारकरी तालावरती योगासनं करण्यात येणार आहेत. नाशिक जिल्ह्यातही योगदिनानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठानं भव्य योग जनजागृती सत्राचं आयोजन केलं आहे.

लातूर इथं योग दिनाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम जिल्हा क्रीडा संकुलात सकाळी साडे सहा वाजता होणार आहे. नांदेड इथं पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर, धाराशिव इथं श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलातल्या बॅडमिंटन हॉलमध्ये, तर बीड इथं जिल्हा क्रीडा संकुलात योग दिनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे. सकाळच्या सत्रात होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**<><><><>**

नाशिकच्या सायकल क्लबने सुरु केलेल्या नाशिक ते पंढरपूर ३६० किलोमीटर पर्यावरण संवर्धन सायकल वारीचं यंदा १३वं वर्ष आहे. या वारीला आज सकाळी नाशिकच्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथे विठ्ठलाच्या आरतीने प्रारंभ झाला त्यावेळी नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महापालिका आयुक्त मनिषा खत्री, नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष हरिष बैंजल, यांसह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय संचार ब्यूरो आणि परभणी सायकलर्सच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त सायकल वारी आजपासून परभणीतून रवाना झाली. परभणी सायकलर्स वारीचं हे सातवं वर्ष असून, या वारीत आंतरराष्ट्रीय योग दिनाचं महत्त्व आणि जनजागृती करण्यात येणार आहे. ही वारी परभणी ते पंढरपूर हे ३०० किलोमीटरचं अंतर दोन दिवसात पार करणार आहे.

यंदा रत्नागिरीतून प्रथमच पंढरपूरला सायकलवारी निघाली आहे. आज (२० जून) सकाळी रत्नागिरी शहरातील श्री विठ्ठल मंदिरातून रत्नागिरी सायकलिस्ट क्लबचे नऊ सायकलिस्ट पंढरपूर वारीसाठी रवाना झाले. रत्नागिरी ते पंढरपूर हा ३०० किलोमीटरचा प्रवास हे सायकल वारकरी दोन दिवसांत पूर्ण करणार आहेत.

<><><><>

जगदगुरु संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचं आज पुण्यात आगमन होणार आहे. या पालख्यांच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. पुणे जिल्हा प्रशासन आणि पुणे महापालिकेतर्फे वारकऱ्यांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पालख्यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यातले विविध २६ रस्ते वेगवेगळ्या वेळेत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येतील.

आषाढी वारीसाठी त्र्यंबकेश्वरहून पंढरपूरकडे निघालेल्या संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीनं आज सकाळी बेलापूरहून राहुरीकडे प्रस्थान केलं. या पालखी सोहळ्यात ६० हजारांहून अधिक वारकरी सहभागी झाले आहेत.

मुक्ताईनगर इथल्या संत श्री मुक्ताबाईंची पालखी बीड जिल्ह्यात असून, आज गढी इथल्या भवानी मंदिर परिसरात पालखीचा रिंगण सोहळा होणार आहे.

येत्या ६ जुलै रोजी आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा साजरा होणार असून मंदिर समितीने वारकरी भाविकांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू केली आहे. यावर्षी श्री विठ्ठल-रुक्मिणी पदस्पर्श दर्शनासाठी मंदिर समितीने विशेष सोय केली आहे. सुमारे ३५ हजार भाविक दर्शनासाठी रांगेत उभे राहू शकतील असा वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. शिवाय भाविकांना पिण्याचं पाणी, चहा आणि जेवणाची सोय केली आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यावर्षी आषाढी वारीसाठी सुमारे १५ ते १६ लाख भाविक येतील असा प्रशासनाचा अंदाज आहे.

<><><><>

संयुक्त राष्ट्रांतर्फे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आज साजरं होत असलं, तरी भारताच्या मातीत हजारो वर्षांपासून सहकाराची भावना आहे. विश्वकल्याणाची भावना भारताच्या नसानसांत आहे आणि हाच सहकाराचा मंत्र आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज

सिंह चौहान यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते आज मुंबईत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेतीचं उत्पन्न वाढवणं, शेतीशी संलग्न विविध उद्योगांद्वारे शेतकऱ्याचं उत्पन्न वाढवणं, तसंच शाश्वत शेतीद्वारे निसर्गाचा समतोल राखणं यासाठी आणलेल्या विविध योजनांचा उल्लेख शिवराज सिंह चौहान यांनी केला. या योजनांच्या केंद्रस्थानी अल्पभूधारक शेतकरी असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. देशाची अन्नसुरक्षा अबाधित राखणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, देशवासीयांना पोषणयुक्त आहार देणं आणि पृथ्वीचं हित जपणं ही सरकारसमोरची प्रमुख उद्दिष्टं असल्याचं त्यांनी सांगितलं. नाफेडसारख्या संस्था शेतकऱ्यांचं पीक खरेदी करून त्याचा योग्य मोबदला थेट शेतकऱ्यांना देतात, याकडे चौहान यांनी लक्ष वेधलं. प्रयोगशाळांमध्ये संशोधन करणारे कृषी वैज्ञानिक आणि शेतात काम करणारे शेतकरी यांच्यातलं अंतर कमी करण्यासाठी सरकारनं विशेष योजना राबवल्याचा उल्लेखही कृषिमंत्र्यांनी केला. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. धरणगाव इथल्या ग्रामीण रुग्णालयाचं उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करून ५० खाटांचं अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारण्याच्या कामाचा प्रारंभ फडणवीस यांच्या हस्ते आज झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील होते. याप्रसंगी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर लोकप्रतिनिधी आणि विविध विभागांचे अधिकारी तसंच मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पासाठी शासनाने ३९ कोटी ४६ लाख ७५ हजार रुपये मंजूर केले असून, अडीच एकर क्षेत्रात या उपजिल्हा रुग्णालयासह ट्रामा केअर सेंटर उभारण्यात येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><>**

कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरू झाली. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांनी आज सकाळी नथु ला मधून जाणाऱ्या ३६ यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. या तुकडीत ४३ ते ६९ वर्ष

वयोगटातले सदस्य असून त्यातल्या १३ महिला आहेत. ही तुकडी ११ ते १२ दिवसात यात्रा पूर्ण करुन गंगटोकला परत येईल. नथु ला खिंडीच्या दुसऱ्या टोकाला चीनच्या अधिकाऱ्यांनी यात्रेकरुंचं स्वागत केलं. तिबेटच्या स्वायत्त प्रदेशातली कैलास मानसरोवर यात्रा पाच वर्षांच्या कालावधीनंतर यंदा होत आहे.

**<><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन चषकाच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिली क्रिकेट कसोटी आज इंग्लंडमधल्या हेडिंग्ले, लीड्स इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडे तीन वाजता सुरू होईल. या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडनं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. नवनियुक्त भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ खेळणार आहे.

दरम्यान, काल अनुभवी खेळाडू जेम्स अँडरसन आणि सचिन तेंडुलकर यांच्या उपस्थितीत अँडरसन-तेंडुलकर चषकाचं अनावरण करण्यात आलं.

**<><><><>**

मराठी मनोरंजन सृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं काल निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. उमदं देखणं व्यक्तिमत्व आणि प्रभावी आवाज याच्या जोरावर त्यांनी रंगमंच, दूरचित्रवाणी आणि रुपेरी पडद्यावर अनेक भूमिका रंगवल्या. लेखन, दिग्दर्शन क्षेत्रातही त्यांनी काम केलं. शिवाय संगीतातही त्यांची रुची होती. प्रसिद्ध अभिनेत्री रिमा लागू यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता. नंतर ते विभक्तही झाले. त्या दोघांची भूमिका असलेलं आपलं बुवा असं आहे हे नाटक खूप गाजलं होतं. विवेक लागू यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंतिम संस्कार करण्यात आले.

**//<><><><>//**